# राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ-१०९७/प्र. क्र. १७८/९७/पंरा.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.

दिनांक १२ नोव्हेंबर १९९७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी

**विषय.**—सरपंच व उपसरपंच यांच्या निवडणूकीबाबत

भारतीय संविधानामधील अनुच्छेद क्र. २४३–सी मधील उपकलम (२) नुसार पंचायतीमधील सर्व जागा प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे भरावयाच्या आहेत. तसेच अनुच्छेद २४३ई मधील उपकलम (३) नुसार या सदस्यांच्या निवडणूका पंचायतीचा कालावधी संपण्यापूर्वी घेण्याबाबत तरतूद आहे.

२. तथापी, मुंबई ग्रामपंचायत निवडणूक अधिनियम १९५८ चे कलम २८ मधील पोटकलम (१) चे खंड (एक) नुसार मावळत्या सदस्यांचा पदावधी समाप्त झाल्याच्या लगतच्या नंतरच्या दिवसापेक्षा उशिरा असणार नाही. अशा दिवशी सरपंच व उपसरपंच यांच्या निवडणूकीची पहिली सभा घेण्याबाबत तरतूद आहे.

३. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २५ ऑक्टोबर १९९७ रोजी राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या मुदती ऑक्टोबर १९९७ ते जानेवारी १९९८ कालावधीमध्ये संपल्या आहेत. अशा ८,५०० ग्रामपंचायतीच्या निवडणूका पार पाडण्याचा कार्यक्रम दिला होता व त्या कार्यक्रमानुसार निवडणूका पार पाडण्यात आलेला आहे. ज्या ग्रामपंचायतीच्या मुदती अद्याप संपलेल्या नाहीत, त्या ग्रामपंचायतीच्या सरपंच व उपसरपंच पदाच्या निवडणूकीची पहिली सभा. ही मावळत्या सदस्यांचा पदावधी संपल्याच्या दिनांकानंतरच्या लगतच्या दिनांकाच्या आधी कोणत्याही परिस्थितीत घेता येणार नाही. म्हणजेच राज्य निवडणूक आयोगाने जरी जानेवारी १९९८ पर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणूका घेतल्या असल्यातरी त्या ग्रामपंचायतीच्या मुदती संपल्यानंतर लगतच्या दिवशी पहिली सभा घेतल्याच्या दिनांकापासून नवनिर्वाचित सदस्याच्या पदावधी सुरु होईल. त्याप्रमाणे सरपंच व उपसरपंच याच्या निवडणूकीची सभा म्हणजेच नवनिर्वाचित सदस्यांची पहिली सभा घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

मा. राज्य निवडणुक आयुक्त याच्या आदेशानुसार,

**(अपर्णा जोशी)**
अवर सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र